# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 11 / 08 / 2022 (गुरूवार)

---

## चोरी

**१) पो.स्टे. कुही** :– अंतर्गत २० कि. मी. अंतरावरील मौजा सुरगाव शिवार कुकरेजा खदान येथे दिनांक ११/०७/२२ चे सायंकाळी ०७.०० वा. ते दिनाक १२/०७/२०२२ चे सकाळी ०६.०० वा. फिर्यादी नामे– दर्शनलाल नाउमल कुकरेजा, वय ५५ वर्ष, रा. प्लॉट क्र. १८१, दयानंद कॉलेजच्या मागे जरीपटका नागपुर यांच्या मालकीच्या खदान मधील स्टोन क्रेशर कंपनीच्या ऑफीस रूममध्ये ठेउन असलेल्या एकुन ५ इलेक्ट्रीक मोटार कि. ४०,०००/–रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार नामदेव पुजारी हे करीत आहे.

**२) पो.स्टे. काटोल** :– अंतर्गत १५ कि. मी. अंतरावरील जटामजिरी शिवारातील कोठयात येथे दिनांक ०५/०८/२२ चे सायंकाळी १८.०० वा. ते दिनाक ०६/०८/२०२२ चे सकाळी ०६.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– वंसतराव संतोषराव मदनकर, वय ६० वर्ष, रा. मोहगांव भदाडे यांच्या जटामजिरी शिवारातील शेतातील कोठयातुन रक्षक कंपनीची करन्ट झटका सोलर मशीन किंमती अंदाजे ७,०००/–रू. ची अज्ञात आरोपीने चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार तपास गौरव आगरकर हे करीत आहे.

## जबरी संभोग

**१) पो.स्टे. रामटेक** :– दिनांक २४/०२/२०२२ चे १२:०० वा. ते १४.०० वा. चे सुमारास फिर्यादी वय २० वर्ष हिचे भावाला मारण्याची धमकी देवुन आरोपी नामे– राष्ट्रपाल वसंता पोटभरे, वय २५ वर्ष, रा. बनपुरी ता. पारशिवनी तिचे सोबत जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवुन फिर्यादीला ६ महीन्यांची गर्भवती केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ३७६, ५०६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि निशा भुते मो.क्र. ९८२२५६६१८० या करीत आहे.

**२) पो.स्टे. सावनेर** :– दिनांक ०४/०४/२०२२ ते दिनांक १५/०६/२०२२ चे १२:०० वा. ते १२.३० वा. चे सुमारास आरोपी नामे– सुधीरप्रसाद मदनप्रसाद मिश्रा, वय १९ वर्ष, रा. जरीपटका, इंदीरानगर झोपडपट्टी नागपुर याची फिर्यादी/पीडिता वय २४ वर्ष हिचे सोबत दि. २१/०३/२०२२ रोजी इन्स्टाग्राम वर ओळख झाली व मैत्री झाली. दि. ०४/०४/२०२२ रोजी फिर्यादीला आरोपीने त्याचे घरी जरीपटका येथे बर्थ डे सेलीब्रेट करण्याचे बहाण्याने घरी नेवुन तेथे आरोपीने फिर्यादी सोबत केक व कोल्ड्रींक्स खावु घातल्याने फिर्यादीला चक्कर आले. त्यानंतर आरोपी तिचे सोबत जबरदस्तीने जबरी संभोग केला. दि. १५/०७/२०२२ रोजी पुन्हा फिर्यादीचा प्रायव्हेट फोटो आरोपी कडे असल्याचे सांगुन आरोपीने त्याचे घरी जरीपटका येथे नेवुन फिर्यादीसोबत जबरदस्तीने शारिरीक संबंध केले व ते फोटो व्हायरल करण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३७६, ३७६(२) (एन), ३२८, ५०६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून सदर गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि सोनाली रासकर मो.क्र. ९८२२५६६१८० या करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**१) पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील भंडारा ते नागपुर एनएच ५३ रोड बालाजी बार लॉज चे अलीकडे मौजा वडोदा येथे दिनांक १०/०८/२०२२ चे २०.३० ते २०.४५ वा. सुमारास एमएच– ४९/बीटी– ८६१३ क्रमांकाचा ॲक्टीव्हा चा चालक आरोपी/मृतक नामे– मिथिलेश सुरेशचंद्र शाहु याने आपल्या ताब्यातील वाहन माथनी वरून नागपुर ला जात असता रोडच्या समोरील खोलगट खडयात गाडीचा चक्का गेल्याने त्याच्या वाहनावरील नियंत्रण बिघडल्याने तो ॲक्टीव्हा गाडीसह खाली रोड वर पडल्याने तो स्वता गंभीर जखमी होवुन उपचारापुर्वी मरण पावला. त्याचे प्रेत नंदनवन पोलीसांच्या ताब्यात दिले.

सदर प्रकरणी सरतर्फे पोउपनि विजयसिंग ठाकुर पो.स्टे. मौदा यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ (अ) भादवी सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि बिरोले मो.क्र ९४२३७०१२६३ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. केळवद** :– अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील आर.टी.ओ. चेक पोस्ट केळवद येथे दिनांक १०/०८/२०२२ चे २३.४० वा. सुमारास मृतक ईसम वय अंदाजे ४० ते ४५ वर्ष असलेला ईसम छिंदवाडा ते सावनेर हायवे रोडने केळवद कडे पायदळ येत असता केळवद आरटीओ चेकपोस्ट समोर त्याच्या मागुन येणारी एमपी– २८/सीए– २५२३ क्रमांकाचा स्कॉर्पिओ गाडीचा चालक आरोपीने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मृतक अनोळखी ईसम यास मागुन धडक दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– मनोज सुरेश पाटील, वय २६ वर्ष, रा. वार्ड क्र. ०३ केळवद ता. सावनेर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. केळवद येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ (अ) भादवी सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री कामठे मो.नं. ९९२३२१०३४४ हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

१) पो.स्टे. वेलतुर :– अंतर्गत टेकेपार ता.कुही जि. नागपूर येथे दि. १०/०८/२०२२ चे ०७.०० वा. सुमारास **दामो सखाराम लेंडे (मृतक), वय ६५ वर्ष, रा. टेकेपार ता.कुही जि. नागपूर** यांनी मुसळधार पावसामुळे त्यांच्या घराचा चाप्यातील सामान ओला होत असल्याने तो सामान काढन्याकरीता गेले असता चाप्यातील ओली झालेली मातीची भिंत मृतकच्या अंगावर पडल्याने मृतक त्या मातीचा भिंतीखाली दबून मरण पावले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– गयाबाई दामो लेंडे वय ६० वर्ष रा टेकेपार ता.कूही जि नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो. स्टे. वेलतुर येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार संजय पायक मो.क्र. ८८३०९२३३१० हे करीत आहे.

२) पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत ११ कि. मी. अंतरावरील मौजा सावळी खुर्द येथे दि. ०६/०८/२०२२ चे १४.०० सुमारास **सौ, अनुसया संपतराव बागडे (मृतक), वय ७५ वर्ष सावळी खुर्द** ही चाय बनविण्यास गेली असता लाईट गेल्याने काचेचा दिवा लावतांना हातातुन खाली पडला. त्यामुळे तिने घातलेल्या कपडयाला आग लागुन ति ४५ टक्के जळाली. तिला उपचाराकामी प्रथम पीएचसी कळमेश्वर व नंतर नागपुर मेडीकल कॉलेज येथे भरती केले उपचारादरम्यान डॉक्टरांनी तपासुन दि. १०/०८/२२ चे ०५.२० वा. सदर मर्ग सुचनेवरून सदरचा मर्ग दाखल करून चौकशीत घेतला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस नाईक आशिष बोरकर पो.स्टे. कळमेश्वर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार लक्ष्मण रूडे हे करीत आहे.

३) पो.स्टे. खापा :– अंतर्गत मौजा सिंदेवानी येथे दि. १०/०८/२०२२ चे ०८.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– संदीप त्रंबकजी पटे, वय ३५ वर्ष रा. खुरसापार ता. सावनेर यांचा साळा नामे– **आशीष गजानन कडक (मृतक), वय २७ वर्ष रा. सिंदेवानी** हा दारू पिन्याच्या सवईचा होता. त्याच्या घरी आई व तो असे दोघे घरी राहात होते. त्याची आई दि ०२/०८/२०२२ मुलीकडे गेली होती हा घरी एकटाच होता. त्यादरम्यान त्याने अज्ञात कारणातुन विषारी औषध प्राषण केले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापा येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोउपनि लोंदे मो.नं ९८५०९००७६८ हे करीत आहे.

पोउपनि श्री भारत थिटे
मो.क्र. ७८८८०१६९४५
पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर